# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तपत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०९.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०८/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४७१ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३,६५,३८०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०८/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ५३.५० लिटर दारू एकुण १२,३२०/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि.०८/१२/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे हिंगोली शहर, हिंगोली ग्रामीण, बाळापुर व वसमत शहर येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०४ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ४,७८०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि.०८/१२/२०२२ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल व अपघात गुन्हे:—**

दि.०८/१२/२०२२ रोजी पोस्टे वसमत ग्रामीण येथे कलम ३०४(अ),३३८,२७९ ३३८, भादवी व कलम १८४ मो.वा.का अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोंपीताने त्याचे ताब्यातील टेम्पो ४०७ ज्याचा क्रमांक एमएच ०४ ई वाय ४१३९ च्या चालकाने सदर ताब्यातील वाहन भरधाव वेगात हयगयी व निष्काळजीपणे चालवुन रोडच्या बाजुला थांबलेल्या फिर्यादीचे मामा नामे शहनशाह युनुस शेख यांना व त्यांच्या मोटार सायकला पाठीमागुन जोराची धडक देवुन गंभीर जखमी करून पळुन जावुन त्यांचे मरणास कारणीभुत ठरला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत पोलीस तपास करित आहेत.

दि.०८/१२/२०२२ रोजी पोस्टे हिंगोली शहर व बासंबा येथे कलम २७९,३३७,३३८, भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोंपीताने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणे वाहन चालवुन धडक दिली म्हणुन फिर्यादीस जखमी केले म्हणुन गुन्हा दाखल गुन्हा दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.